| MHKO070009602024 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३७/२०२४ मधील नि.क्र.१ वरील</u>** <br> **<u>आदेश</u>** <br> **(श्रीमती गंगुबाई परीट आणि इतर – विरुध्द – कोणी नाही.)** |
|---|---|

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी ते मयत बाबू रामा परीट यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील व अर्जदार नं.४ यांचे सासरे व अर्जदार नं.५ ते ७ यांचे आजोबा बाबू रामा परीट हे दि.२०/०५/२००१ इ.रोजी अर्जुनवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ यांचा मुलगा व अर्जदार नं.२ व ४ यांचा भाऊ व अर्जदार नं.४ यांचे पती व अर्जदार नं.५ ते ७ यांचे वडील चंद्रकांत बाबू परीट हे दि.०५/०९/२०२२ रोजी मयत झालेले आहेत, त्यांना अर्जदार हेच सरळ कायदेशीर वारस आहेत.

**०३.** अर्जदार पुढे असे कथन करतात की, मयत बाबू रामा परीट यांचे नांवे अर्जुनवाड येथे सि.स.नं.६०१ ची मिळकत आहे. बाबू रामा परीट हे मयत झालेनंतर अर्जदार हे प्रॉपर्टी कार्डास वारस नोंद करणेस गेले असता संबंधीत कार्यालयाने त्यांना मे.दिवणी न्यायालकाडून वारसा हक्क प्रमाणपत्र सादर करणेस सांगीतले असल्यामुळे सदरचा अर्ज अर्जदार यांना दाखल करणे भाग पडलेले आहे. तसेच सि.स.नं.६०१ या मिळकतीस रामा परीट यांचा दुसरा मुलगा बापू रामा परीट यांचे सुध्दा नांव आहे. परंतु बापू रामा परीट हे गेल्या ब–याच वर्षापासून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेवून सुध्दा ते मिळून आले नाहीत. तसेच ते अविवाहीत असल्यामुळे त्यांना अर्जदार हेच सरळ वारस आहेत.

**०४.** अर्जदार यांना मयत बाबू रामा परीट यांचे वारसा प्रमाणपत्र त्यांचे शासकीय कामासाठी आवश्यक असलेने अर्जदारांनी कायदेशीर वारस असलेबाबत जाहीर होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०५.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरिता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामूळे त्यांच्या कारणमिंमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेस पात्र आहेत का ? | ... होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>का र ण मी मां सा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबत</u> :-**

**०६.** अर्जदार नं.४ श्रीमती सुनिता चंद्रकांत परीट यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.९** अन्वये दाखल केले आहे. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी अर्जदार यांनी मयत बाबू रामा परीट यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत **नि.क्र.२२** वर, तसेच मयत चंद्रकांत बाबू परीट यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत **नि.क्र.६** वर, मयत बापू रामा परीट यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत **नि.क्र.२१** वर व इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी पुरावा बंद ची पुरसीस दिलेली आहे.

०७. सदर प्रकरणात अर्जदार यांनी दैनिक जनप्रवास **(नि.क्र.१२)** या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २२/०६/२०२४ रोजी जाहीरनामा काढून हरकती मागविण्यात आल्या. तसेच जाहिर नोटीस **नि.क्र.८** नुसार मयताचे घरी अर्जदार यांचे पत्यावर, अर्जुनवाड ग्रामपंचायत यांचे नोटीस बोर्डवर, सह दिवाणी न्यायालय जयसिंगपूर यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या. सदर जाहीरनामा व जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धी नंतरही आजपावेतो इतर कोणीही अर्जदार हे मयत कै.बाबू रामा परीट यांचे वारस नाहीत अशी हरकत उपस्थित केलेली नाही. सदर जाहीरनाम्यामध्ये दिलेल्या मुदतीत कोणीही हरकतदार हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरण विनाहरकत, विनाउत्तर राहिले आहे.

०८. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.९** अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात त्यांच्या अर्जातील कथनाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदार हे मयत कै. बाबू रामा परीट यांचे वर्ग– १ चे वारस असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदारांच्या नावाने वारस हक्क प्रमाणपत्र देण्यास कोणतीही अडचण दिसून येत नाही.

०९. अर्जदार हे मुंबई नियमन कलम १ व २ अन्वये दाखला मिळण्यास पात्र ठरतात. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाहीत. मे. मुंबई उच्च न्यायालयाने अनेक निवड्यामध्ये वारसा प्रमाणपत्र हे फॉर्मल रिकग्निशन (formal) असल्याचे म्हटलेले आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | अर्जदार नं.१ **श्रीमती गंगुबाई बाबू परीट**, अर्जदार नं.२ **सौ.जयश्री धनपाल मडीवाळ**, अर्जदार नं.३ **सौ.अंजली राजू राहुटे**, अर्जदार नं.४ **श्रीमती सुनिता चंद्रकांत परीट**, अर्जदार नं.५ **सौ.सुप्रिया रविंद्र कोरे**, अर्जदार नं.६ **सौ.सुजाता विजय परीट व** अर्जदार नं.७ **श्री.वैभव चंद्रकांत परीट** हे मयत **कै.बाबू रामा परीट** यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते. |
| ३. | अर्जदार हे वर नमूद केलेप्रमाणे वारस असल्याने त्यांना त्यांचे नांवे मुंबई नियमन कायदा १८२७ च्या विनियम ८ नियम २ व ३ प्रमाणे व परिशिष्ठ ब मधील विहीत नमुन्यामध्ये योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) अर्जदार यांचे नावे देण्यात यावे. |
| ४. | वारसा प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी. |

जयसिंगपूर.

SUKRUT SANJAY MHATARMARE
Digitally signed by SUKRUT SANJAY MHATARMARE
Date: 2026.07.07 15:55:36 +0530

दिनांक – ०७/०७/२०२६  ( **सुकृत सं. म्हातारमारे**)

३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर